# श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई

S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
: 2422 4438, 2422 2072 Fax : 2422 1558

(Controlled by Govt. Of Maharashtra)
www.siddhivinayak.org
e-mail : svt@vsnl.com


# Nit Document

मंदिरातील महाप्रसाद विभागात स्वयंपाक (जेवण, अल्पोपहार व इतर) बनविण्याच्या कामाचे कंत्राट देण्यासाठी ई–निविदा मागविण्याबाबत.

स्वयंपाक (जेवण, अल्पोपहार व इतर ) बनविणे या कामाच्या कंत्राटाचा कालावधी
१ सप्टेंबर, २०१९ ते ३१ मार्च, २०२० पर्यंत


**श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई ४०००२८**

फोन नं.–: ०२२–२४२२४४३८, २४२२२०७२, २४२२३२०६, २४३७३६२६ फॅक्स –: २४२२१५५८


## : ई–निविदा सूचना:

मंदिरातील महाप्रसाद विभागात स्वयंपाक (जेवण, अल्पोपहार व इतर) बनविण्याच्या कामाचे कंत्राट देण्यासाठी ई निविदा मागविण्यात येत आहेत. ई निविदेबाबतची सविस्तर माहिती (अटी व शर्ती) तसेच निविदा अर्ज डाऊनलोड करण्यासाठी **www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळास किंवा **www.siddhivinayak.org** या न्यासाच्या बेबसाईटला भेट दयावी.

- ई निविदा प्रसिध्दीचा दिनांक –: गुरुवार दि. ८ ऑगस्ट, २०१९
- निविदा पूर्व बैठक (Pre-bid Meeting) –: गुरुवार दि. २२ ऑगस्ट, २०१९ दुपारी १२ वाजता
- स्थळ –: तिसरा मजला, मंदिर न्यास कार्यालय
- ई निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक –: गुरुवार दि. २९ ऑगस्ट, २०१९ दुपारी १ वाजेपर्यंत
- तांत्रिक निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ –: शुक्रवार दि. ३० ऑगस्ट, २०१९ दुपारी २ वाजता
- स्थळ –: तिसरा मजला, न्यास कार्यालय
- मूल्य निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ –: शुक्रवार दि. ३० ऑगस्ट, २०१९ दुपारी ३ वाजता
- स्थळ –: तिसरा मजला, न्यास कार्यालय

(प्रियांका रं. छापवाले)
कार्यकारी अधिकारी

# श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई

S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
: 2422 4438, 2422 2072 Fax : 2422 1558

(Controlled by Govt. Of Maharashtra)
www.siddhivinayak.org
e-mail : svt@vsnl.com

## मंदिरातील महाप्रसाद विभागात स्वयंपाक (जेवण, अल्पोपहार व इतर) बनविण्याच्या कामाचे कंत्राट देण्यासाठी ई–निविदा मागविण्याबाबत.

## कंत्राट कालावधी – दि. १ सप्टेंबर, २०१९ ते दि. ३१ मार्च २०२० पर्यंत

### अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशील | पान क्र. |
|---|---|---|
| १ | ई–निविदा सूचना | १ |
| २ | ई–निविदेच्या अटी व शर्ती. | ३ ते ४ |
| ३ | कंत्राट कालावधीत करावयाच्या कामाचा तपशील | ५ |
| ४ | कंत्राटधारकाने ऑनलाईन स्कॅन करून अपलोड करावयाची कागदपत्रे तसेच कंत्राटधारकाने लिफाफा क्र. १ तांत्रिक निविदा (Technical Bid) सोबत न्यासास सादर करावयाची कागदपत्रे. | ६ |
| ५ | हमीपत्र | ७ |
| ६ | लिफाफा क्र. २ मूळ निविदा (वाणिज्जीक– Commricial) कंत्राटधारकाने ऑनलाईन स्कॅन करून अपलोड करावयाचे बीड ऑफ कोटेशनचा (BOQ) तपशील. | ८ |

# श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई

S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
: 2422 4438, 2422 2072 Fax : 2422 1558

(Controlled by Govt. Of Maharashtra)
www.siddhivinayak.org
e-mail : svt@vsnl.com

## अटी व शर्ती

१) स्वयंपाक (जेवण, अल्पोपहार व इतर) बनविण्याच्या कामाचे कंत्राट देण्यासाठी ई–निविदा ऑनलाईन भरावयाची आहे. निविदा ऑनलाईन भरावयाची असल्यामुळे तांत्रिक निविदेचा (Technical Bid) एकच लिफाफा मागविण्यात येत आहे. **सदर लिफाफ्यामध्ये बीड ऑफ कोटेशन (BOQ) माहिती देवू नये**.

२) लिफाफा क्र. १ वर श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, स्वयंपाक (जेवण, अल्पोपहार व इतर) बनविण्याच्या कामासंदर्भातील (पान क्र. ६ वरील) कागदपत्रे व लिफाफा क्र. १ तांत्रिक निविदा (Technical Bid) असा स्पष्ट उल्लेख करावा. तांत्रिक निविदा (Technical Bid) लिफाफ्यामधील कागदपत्रांच्या प्रत्येक पानावर निविदाधारकाची स्वाक्षरी व संस्थेचा शिक्का असावा.

३) निविदा अपलोड करतेवेळी निविदा प्रपत्राचे शुल्क (Tender Fee) रु. १०००/– व बयाणा रक्कम (EMD) रू. १०,०००/– इतकी ऑनलाईन इंटरनेट बॅकींगमार्फतच जमा करावी लागेल. निविदा प्रपत्राचे शुल्क व बयाणा रक्कम भरल्याशिवाय सादर केलेली निविदा स्विकृत केली जाणार नाही.

४) ऑनलाईन इटरनेट बॅकींगकरीता एस. बी. आय. बॅक किंवा इतर इटरनेट बॅकींगकरीता एस.बी.आय. MOPS **( Multiple Option Payment System )** चा वापर करावा.

५) ई–निविदाधारकाने तांत्रिक निविदा (Technical Bid) व बीड ऑफ कोटेशन (BOQ) अशा दोन प्रकारच्या ई–निविदा भरताना काही माहिती अपूर्ण ठेवल्यास/राहिल्यास त्या ई–निविदा कोणतेही कारण न देता रद्द समजण्यात येतील. अंतिम निर्णय हा श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास यांचेसाठी राखीव असेल.

६) कमी जास्त दराची कोणतीही ई–निविदा स्विकारण्याचा/नाकारण्याचा अथवा सर्व ई–निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार न्यासाने राखून ठेवलेला आहे. त्याबद्दलची कारणे, स्पष्टीकरण देणे श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास बंधनकारक राहणार नाही.

७) मागील वर्षाची उलाढाल कमीत कमी रू. १५ लक्ष असणे आवश्यक आहे.

८) ई–निविदाधारकास नामांकित कंपन्या, हॉटेल्स, रूग्णालये, शासकीय कार्यालये/विभाग वगैरे ठिकाणी स्वयंपाक बनविण्याच्या कामाचा अनुभव असावा.

९) निविदाधारक हा मुंबई, ठाणे या परिक्षेत्रातील असावा.

१०) निविदाधारक यांच्याकडे कॅटरींग व्यवसायाचा कमीत कमी ५ वर्षांचा अनुभव असावा.

११) निविदाधारकाने मुंबई परिक्षेत्रात मागील २ वर्षापासून काम चालू असल्याचा पुरावा सादर करणे आवश्यक असेल.

१२) निविदाधारकाचे मुंबईत ज्या संस्थेमध्ये काम चालू आहे त्या संस्थेकडून काम समाधानकारक करीत असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करुन ते जोडणे आवश्यक असेल.

१३) निविदा प्रक्रियेमध्ये स्विकृत केलेले दर दि. ३१ मार्च, २०२० अखेर पर्यंत कायम राहतील. मान्य दरामध्ये कोणत्याही कारणास्तव कंत्राट कालावधीत भाववाढ दिली जाणार नाही/मागता येणार नाही. आपण स्वयंपाक बनविण्याचे काम नाकारल्यास आपली पूर्ण किंवा अंशत: बयाना रक्कम न्यासात जमा करण्यात येईल. याप्रकरणी न्यास व्यवस्थापनाचा निर्णय अंतिम राहील.

१४) निविदा मंजूर झाल्यानंतर ८ दिवसाच्या आत निविदाधारकाने कंत्राट कालावधीमध्ये करावयाच्या कामाच्या एकूण मजुरीच्या १०% रक्कमेची बॅक गॅरेंटी न्यासास सादर करणे बंधनकारक आहे. न्यासाकडे जमा असलेली बयाना रक्कम वजा करुन उर्वरीत रकमेकरीता बॅक गॅरेंटी स्विकारण्यात येईल. बॅक गॅरेंटी राष्ट्रीयकृत वा अनुसूचित बॅकेची असणे आवश्यक आहे.

१५) स्वयंपाकाकरीता लागणारा कच्चा माल, भांडी, गॅस शेगडी व गॅस न्यासातर्फे कंत्राटदारांना पुरविण्यात येतील.

S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28 (Controlled by Govt. Of Maharashtra)
: 2422 4438, 2422 2072 Fax : 2422 1558 www.siddhivinayak.org
e-mail : svt@vsnl.com

१६) स्वयंपाकाच्या संपूर्ण पूर्वतयारीसह (तांदूळ, डाळ साफ करणे व भाजीपाला निवडणे, कापणे इत्यादी) जेवण बनविणे बंधनकारक असेल.

१७) जिन्नस आणून देणे, जेवण वाढणे, भांडी धुणे व चपात्या करणे ही कामे न्यासाचे कर्मचारी करतील.

१८) कंत्राटदाराने दररोज स्वयंपाक गृहासह संपूर्ण मजल्याची साफसफाई करणे बंधनकारक असेल.

१९) कंत्राट आदेशामध्ये नमुद केलेल्या स्वयंपाकाच्या कामाच्या प्रमाणापेक्षा जास्त प्रमाणात स्वयंपाक बनविण्यात आल्यास सदर वाढीव काम मान्य दराने करणे आपणास बंधनकारक राहिल.

२०) कंत्राटदाराने नेमलेल्या सर्व कर्मचाऱ्यांच्या आरोग्याचा दाखला, कायम रहिवाशी दाखला व ओळखपत्र कंत्राटदाराने न्यासास देणे आवश्यक आहे.

२१) ई–निविदा भरतांना कर वगळून रक्कम भरावी. सरकारी नियमानुसार आवश्यक तेथे आयकर कपात केली जाईल. तसेच सर्व प्रकारचे कर अदा करणेची जबाबदारी कंत्राटधारक यांची राहील.

२२) सदरची ई–निविदा कार्यादेश नसून फक्त बीड ऑफ कोटेशन (BOQ) मागविण्यासाठी आहे.

२३) निविदाधारकाने सादर केलेली निविदा न्यासाच्या अटी व शर्तीनुसार करारनामा म्हणून ग्राह्य धरण्यात येईल. त्याबाबत कुठलीही तक्रार चालणार नाही. निविदेतील अटी व शर्ती कराराचा भाग असतील.

२४) बिलाची रक्कम न्यास कार्यालयातून अदा होणार असल्यामुळे सदरील व्यवहाराबाबत वाद झाल्यास तो मुंबई कोर्टाचे न्याय संवाद कक्षेत राहील.

२५) बयाणा रक्कम, कंत्राट करार संपल्यावर ६० दिवसानंतर परत केली जाईल.

२६) कार्यादेशाप्रमाणे बनविण्यात येणारे स्वयंपाक केव्हाही परिक्षण करण्याचा न्यासाला पूर्ण अधिकार राहील.

२३) स्वयंपाक बनविण्याच्या कामाच्याबाबतीत विविध नियम, वैधानिक बाबी निविदाधारक यांच्यावर बंधनकारक राहील.

२७) न्यासाने दिलेले स्वयंपाक बनविण्याचे काम वेळेत न केल्यास, कामात चालढकल केल्यास, अथवा स्वयंपाक बनविण्याचे काम समाधानकारक न केल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता निविदा रद्द करुन कंत्राटधारकाची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

२८) ई–निविदेत नमूद केलेल्या कामासाठी कंत्राटधारक यांनी दुसऱ्या उप कंत्राटधारकाला काम दिल्याचे आढल्यास निविदाधारकाचे कंत्राट रद्द करण्यात येईल.

२९) Nit document मध्ये नमूद केलेले काम गुणवत्तेच्या आधारावर देण्यात येणार आहे. त्यासाठी कंत्राटधारकाची पान क्र. ६ मध्ये दर्शविलेली कागदपत्रे साक्षांकीत करून त्याचा संच न्यासास सादर करणे आवश्यक आहे.

३०) ई–निविदेमधील अटी शर्तीचा व कागदपत्रांचा अभ्यास करून ई–निविदा सादर करावी. ई–निविदेसंबंधी काही शंका असेल तर त्यांनी श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई कार्यालयात दूरध्वनी क्र. ०२२–२४२२४४३८, २४२२२०७२, २४३७३६२६, २४२२३२०६ विस्तारीत क्र. ११२ वर संपर्क करावा.

३१) ज्या दिवशी निविदा उघडण्यात येणार आहेत त्या दिवशी ई–निविदेद्वारे अपलोड कलेल्या सर्व कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतींचा एक संच तपासणीसाठी न्यासास सादर करणे बंधनकारक असेल.

३२) **संकेतस्थळाच्या माहितीकरीता टोल फ्री क्र. ०१२०–४२००४६२, ०१२०–४००१००२ टोल फ्री मो. क्र. ८८२६२४६५९३.**

आपली स्नेहांकित,

(प्रियांका र. छापवाले)
कार्यकारी अधिकारी

श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई
S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
: 2422 4438, 2422 2072 Fax : 2422 1558
(Controlled by Govt. Of Maharashtra)
www.siddhivinayak.org
e-mail : svt@vsnl.com

## कंत्राट कालावधीमध्ये स्वयंपाक (जेवण, अल्पोपहार व इतर) कामाचा तपशील खालीलप्रमाणे.

### महिन्याभरात होणारे अंदाजे काम

| क्र. | कामाचे स्वरुप | कामाचा तपशील ( पदार्थ ) | एकूण व्यक्ती | प्रति महिना अंदाजे दिवस |
|---|---|---|---|---|
| १ | जेवण | साधा भात, आमटी किंवा डाळ, सुकी भाजी, पातळ भाजी, कोशिंबीर, एक गोड पदार्थ व पुरी(आवश्यकतेनुसार) | दररोज दुपारी २०० व्यक्तीपर्यंत | ३० |
| | | | दर मंगळवारी रात्रीकरीता ५० व्यक्तीपर्यंत | ५ |
| २ | विशेष जेवण | साधा भात, मसाले भात किंवा पुलाव, पुरी, वरण, आमटी, सुकी भाजी, पातळ भाजी, मिक्स भजी, ताक, पापड, कोशींबिर किंवा सलाड, एक गोड पदार्थ (उदा.जिलेबी, शेवयाची खिर, शिरा, मुग डाळ हलवा इ. पैकी एक) | हवन पूजे दिवशी किंवा न्यासाची बोर्ड मिटींग दिवशी ५० व्यक्तीपर्यंत | ६ |
| ३ | अल्पोपहार | खमंग ढोकला/इडली/मेंदूवडा/मिसळ /बटाटा वडा/पोहे/कांदा भजी/उपमा/कोथिंबीर वडी. इ. | १५० व्यक्ती (दररोज) | ३० |
| ४ | चहा | चहा (सकाळ व संध्याकाळ) | २०० व्यक्ती (दररोज) | ३० |
| ५ | श्री सत्यनारायण पूजा प्रसाद | प्रति पूजा १ किलो रव्याचा प्रसाद (शिरा) | दिवसाला सरासरी ३ पूजा | २० |
| ६ | मोदक | हवन पूजेमध्ये अर्पण करण्याकरीता प्रति हवन १२०० छोटे तळलेले मोदक | ५ ते ६ हवन महिन्याला | ५ |

# श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई

S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
: 2422 4438, 2422 2072 Fax : 2422 1558

(Controlled by Govt. Of Maharashtra)
www.siddhivinayak.org
e-mail : svt@vsnl.com


## निविदाधारकाने ऑनलाईन स्कॅन करून अपलोड करावयाची कागदपत्रे

### लिफाफा क्र. १ तांत्रिक निविदा (Technical Bid)

खालील तपशीलाप्रमाणे कागदपत्रे तांत्रिक निविदा (Technical Bid) ऑनलाईन स्कॅन करून अपलोड करावीत. तसेच निविदाधारकाने खालिलप्रमाणे प्रत्येक पानावर स्वाक्षरी व संस्थेचा शिक्का मारून लिफाफा क्र. १ तांत्रिक निविदा (Technical Bid) सोबत न्यासास सादर करावयाची.

| अ.क्र. | अपलोड करुन सादर करावयाची कागदपत्रे |
|---|---|
| १ | ई–निविदेसोबत निविदेची किंमत/शुल्क जमा केल्याबाबतची इंटरनेट बँकेकडील पावती |
| २ | बयाणा रक्कम जमा केल्याबाबतची इटरनेट बँकेकडील पावती |
| ३ | कंपनी नोंदणी दाखला (Shop Act Licence) |
| ४ | आयकर नोंदणी पॅन कार्ड |
| ५ | जी एस टी क्रमांक |
| ६ | मागील ३ वर्षाचा आय. टी. आर., जी. एस. टी., सी. जी. एस. टी.<br>(A. Y. 2017-2018, 2018-2019, 2019-2020) |
| ७ | सन २०१८–१९ चा वार्षिक उलाढालीबाबत लेखा परिक्षण अहवाल |
| ८ | हमी पत्र |
| ९ | ई–निविदेसंबंधी चर्चा करणेसाठी अधिकृत व्यक्तीच्या नावाचे अधिकारपत्र जोडावे |

# श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई

S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
: 2422 4438, 2422 2072 Fax : 2422 1558

(Controlled by Govt. Of Maharashtra)
www.siddhivinayak.org
e-mail : svt@vsnl.com

## हमीपत्र

दिनांक – / /२०१९

प्रति,
मा. कार्यकारी अधिकारी
श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास,
प्रभादेवी, मुंबई – ४०००२८

महोदय,

मी/आम्ही———————————————————————

खालील निम्न स्वाक्षरीकार याद्वारे घोषित करतो की,

१. मी/आम्ही कागदपत्रे, अटी व शर्ती, अन्य बाबी तपासून त्याबाबत खात्री केली असून या विषयी आमची कोणतीही शंका नाही.

२. मी/आम्ही नमूद केलेल्या दरामध्ये जीएसटी वगळून सर्व प्रकारच्या शुल्कांची आकारणी समाविष्ट आहे.

३. ई–निविदेत नमूद केलेले स्वयंपाक (जेवण, अल्पोपहार व इतर) बनविण्याच्या कामाचे कंत्राट करणे बंधनकारक राहील.

४. आमची निविदा स्विकृत केल्यास आम्ही कराराच्या संपूर्ण कालावधीत न्यासाने विहीत केल्यानुसार Bank Guarantee देण्यास बांधील आहोत.

५. आम्ही याद्वारे हमी देतो की, शासकीय / निमशासकीय / सार्वजनिक उपक्रम यांनी यापूर्वी आमच्या कामाच्या संदर्भात आमच्या विरूध्द प्रतिबंधात्मक कारवाई केलेली नाही.

६. आम्हास माहित आहे की, निविदा स्विकृत करण्यासंदर्भात न्यासास संपूर्ण अधिकार आहे. तसेच कोणतेही कारण न देता निविदा नाकारण्याचा अधिकार न्यासास आहे.

७. निविदेसोबतची सर्व कागदपत्रे आम्ही काळजीपूर्वक वाचली असून निविदेतील अटी व शर्ती, अन्य बाबी आम्हांस मान्य असून त्या बंधनकारक आहेत.

निविदाधारकाची सही व शिक्का